MHAU120000192021

| | | |
|---|---|---|
| प्राप्त तारीख | : | ०८.०१.२०२१ |
| नोंदणी तारीख | : | ०८.०१.२०२१ |
| निकाल तारीख | : | ११.०८.२०२६ |
| कालावधी | : | वर्ष महिना दिवस<br>**०५ ०७ ०३** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शिर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

| | |
|---|---|
| | **नि.क्र.५२** |
| **सोयगांव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, सोयगांव यांच्या न्यायालयात,**<br>पिठासिन अधिकारी : एम.बी. पाटील, | |
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र.<br>**सोयगाव पोलीस स्टेशन.** |
| **प्रकरण क्रमांक** | **नियमित फौजदारी खटला क्र.–०१/२०२१** |
| तक्रारकर्ता/अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**<br>मार्फत/द्वारा पोलीस स्टेशन अधिकारी,<br>सोयगाव पोलीस स्टेशन.<br>(फिर्यादी –संजय दगडु सोनवणे) |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्रीमती आर.एस. हटकर** (सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता) |
| आरोपी | १. मिलींद भावराव धिवर<br>वय–३७ वर्षे, व्यवसाय–नोकरी,<br>२. भावराव भिकाजी धिवर **(मयत)**<br>३. वैशाली बाळकृष्ण जाधव<br>वय–४० वर्षे, व्यवसाय–व्यापार,<br>४. जिजाबाई भावराव धिवर<br>वय–७० वर्षे, व्यवसाय–शेती,<br>सर्व रा.बनोटी, ता. सोयगांव, जि.औरंगाबाद. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **श्री. डी. आर. सुर्यवंशी,** (बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

## भाग ब*

### [फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | ११.०९.२०२० |
| पहिल्या खबरीची तारीख | ११.०९.२०२० |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १४.१०.२०२० |
| दोषारोप निश्चितीची तारीख | ०४.११.२०२२ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १६.०६.२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | ११.०८.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | ११.०८.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | - |

### आरोपींबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोष सिध्द की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १.<br>२.<br>३.<br>४. | मिलींद भावराव धिवर<br>भावराव भिकाजी धिवर **(मयत)**<br>वैशाली बाळकृष्ण जाधव<br>जिजाबाई भावराव धिवर | दि.१२.०९ २०२० सर्व आरोपींना सी.आर.पी. सी.४१-अ ची नोटीस. | | भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ प्रमाणे. | **निर्दोष** | - | - |

## भाग क*

## [फौजदारी नियमावलीच्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]

## अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र.१ | संजय दगडु सोनवणे **(नि. क्र.–४४)** | फिर्यादी |
| सा.क्र.२ | राजेंद्र दगडु सोनवणे **(नि. क्र.–४५)** | साक्षीदार |
| सा.क्र.३ | विजय दगडु सोनवणे **(नि. क्र.–४८)** | साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबध्द दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u> :**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | **निशाणी– ४९ /बचाव पक्षातर्फे मान्य** | घटनास्थळ पंचनामा |
| २. | **निशाणी–५० व ५१/बचाव पक्षातर्फे मान्य** | वैद्यकीय प्रमाणपत्र |

**ड. <u>महत्वाच्या वस्तु</u> :**

| **अ.क्र.** | **महत्वाची वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| | – | एक काळसर रंगाचा ओबड धोबड दगड अंदाजे ७५० ग्रॅम वजनाचा. |

## <u>न्यायनिर्णय</u>

## (दिनांक – ११ ऑगस्ट, २०२६ रोजी घोषित)

**०१.** आरोपींविरुध्द प्रस्तुतचा खटला भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी चालविण्यात आला.

**<u>अभियोगपक्षाचे थोडक्यात कथन असे की,</u>**

**०२.** दि.११.०९.२०२० रोजी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास, मौजे बनोटी, ता. सोयगाव, फिर्यादी हा त्यांच्या घरासमोर उभा असताना, त्याच्या घराचे बाजूला राहणारे आरोपी क्र.१ ते ४ हे अंगणात उभे होते. त्यावेळी फिर्यादीने त्यांना "तुम्ही ही टपरी समाज मंदीराच्या बाजूला का ठेवली" असे विचारले. त्यावेळी आरोपी हे फिर्यादीला काहीही बोलले नाही. तेव्हा फिर्यादी याने ग्रामपंचायत कार्यालय बनोटी येथे आरोपींविरोधात अर्ज दिला व त्याठिकाणी आरोपींना बोलविण्यात आले. त्याठिकाणी आरोपी क्र.१ मिलींद हा आला, ग्रामपंचायत सदस्य यांनी टपरीबाबत विचारणा केली असता, आरोपी मिलींद याने फिर्यादीस शिवीगाळ केली. त्यानंतर फिर्यादी हा त्यांच्या गावातील इद्रीस लियाकत व महेमुद खाटीक असे ११.३० वाजण्याचे सुमारास समाज मंदीराजवळ गेले व आरोपींना म्हणाले की, "तुम्ही ही टपरी येथे ठेवू नका, ही समाज मंदीराची जागा आहे". त्यावेळी आरोपी क्र.१ मिलींद याने खाली पडलेला दगड उचलुन फिर्यादीच्या डोक्यात मारला व त्याचे डोके फुटले. त्यावेळी त्यांचा मोठा भाऊ विजय सोनवणे हा भांडण सोडविण्यासाठी आला असता, त्यास पण आरोपी क्र.१ मिलींद याने डोक्यात दगड मारला व त्याचे डोके फुटले. तसेच आरोपी क्र.३ वैशाली हिने फिर्यादीच्या भावास लोटलोट केली व आरोपी क्र.३ व ४ यांनी चापटबुक्यांनी मारहाण करुन, जिवे मारण्याचा दम दिला. त्यावेळी गावातील खैरनार व शांताराम पवार यांनी भांडणाची सोडवा–सोडव केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरोधात सोयगाव पोलीस स्टेशन फर्दापूर येथे फिर्याद दाखल केली.

**०३.** उपरोक्त आशयाच्या फिर्यादीवरुन आरोपींविरुध्द **<u>गु.र.क्र.–१११/२०२०</u>** भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०४ सहकलम ३४ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पो. ना. वाय. पी. झाल्टे यांचेकडे देण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले आणि घटनास्थळाचा पंचनामा केला तसेच वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले व तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३, ५०४ व ५०६ सहकलम ३४ अन्वये दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

०४. आरोपी हजर झाल्यानंतर, माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द **नि.क्र.–१९** नुसार भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३२४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वयेच्या गुन्हयाकरीता दोषारोप नोंदवला. दोषारोप आरोपींना समजावुन सांगितला. आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन, संपरिक्षेची मागणी केली.

०५. आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुरावा न आल्याने, आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ अन्वये जबाब नोंदविण्यात आलेले नाहीत. आरोपी क्र.२ भावराव हा मयत असल्याबाबत नि.क्र.१ वर दि.०६.११.२०२४ रोजी अ‍ॅबेटचा आदेश पारीत करण्यात आला.

०६. खालीलप्रमाणे मुद्दे माझे निष्कर्षासाठी उपस्थित झाले. त्यावरील माझे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, ११.०९.२०२० रोजी सकाळी ११.३० वाजण्याच्या सुमारास मौजे बनोटी, ता. सोयगांव, जि. औरंगाबाद येथे आरोपींनी, समान उद्देशाने, आरोपींनी फिर्यादी व त्याच्या भावास डोक्यावर दगडाने मारहाण करुन, इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व दगडाचा वापर हत्यार म्हणून केला व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२४ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला? | ...**नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने समान उद्देशाने, फिर्यादीस व त्याचे भावास लाथाबुक्यांनी मारहाण करुन, इच्छापूर्वक दुखापत पोहोचविली व त्यायोगे त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे अपराध केला? | ...**नकारार्थी** |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, उपरोक्त नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी समान उद्देशाने फिर्यादीस फौजदारी धाकदपटशा करुन, जिवे मारण्याची धमकी दिली व त्यायोगे | ...**नकारार्थी**. |

त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला अपराध केला?

४. अंतिम आदेश काय? **...आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.**

## कारणमिमांसा

**०७.** अभियोग पक्षाने आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी व इतर एका साक्षीदाराची साक्ष नोंदविली. अभियोग पक्षाचे तोंडी विनंतीवरुन नि. क्र.१ वर आदेश पारीत करुन, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

**मुद्दे क्र.१ ते ३ बाबत –**

मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष हे एकमेकांशी निगडीत असल्याने, त्यांची कारणमिमांसा पुनरावृत्ती टाळण्याकरीता एकत्रीतच नोंदविली आहे.

**०८.** अभियोग पक्षातर्फे फिर्यादी संजय (सा.क्र.१) यांची साक्ष नोंदविण्यात आली, त्यांनी त्यांच्या पुराव्यात घटना किती तारखेला, कुठे घडली हे माहिती नसल्याचे कथन केले. फिर्यादीने फिर्यादवरील त्याची सही असल्याचे व त्यातील मजकुर बरोबर नसल्याचे कथन केले आहे. त्यामूळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे फिर्यादी यांचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, उलटतपास होवून, देखील फिर्यादी यांच्या पुराव्यातून अभियोग पक्षास सहकार्य होईल, अशी कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात फिर्यादीस फिर्यादमधील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखवण्यात आला, मात्र, सदर भाग फिर्यादी याने खरा व बरोबर नसल्याचे कथन केलेले आहे. याउलट, सदर फिर्यादी यांनी त्यांच्यात व आरोपींमध्ये आपसात तडजोड झाली असल्याचे मान्य केले आहे.

**०९.** अभियोग पक्षातर्फे राजेंद्र (सा.क्र.२) व विजय (सा.क्र.३) यांची साक्ष नोंदविण्यात आली, त्यांनी त्यांच्या पुराव्यात घटनेबाबत काहीही माहिती नसल्याचे कथन केले. याव्यतिरीक्त साक्षीदारांनी काहीही कथन केले नाही. त्यामूळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांच्यातर्फे सदर साक्षीदारांचा उलटतपास घेण्यात आला. मात्र, उलटतपास होवून, देखील साक्षीदारांच्या पुराव्यातून अभियोग पक्षास सहकार्य होईल, अशी कोणतीही बाब पटलावर आलेली नाही. याउलट, अभियोग पक्षातर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात साक्षीदारांना साक्षीमधील अधोरेखांकीत भाग–अ वाचुन दाखवण्यात आले, मात्र, सदर भाग साक्षीदारांनी खरा व बरोबर नसल्याचे कथन केलेले आहे.

**१०.** येथे एक बाब नमुद करावीशी वाटते ती अशी की, फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १५४ प्रमाणे प्रथमखबर व फिर्याद दाखल केल्यानंतर फौजदारी प्रक्रिया व्यवस्था गतिमान होत असते. परंतु, मुळात फिर्यादीच जर न्यायालयात येवुन त्याने पोलीसांना दिलेली फिर्यादी पासुन मुकरत असेल तर प्रकरण पुढे लांबविण्याची काहीही आवश्यकता नाही. प्रस्तुत प्रकरणात देखील फिर्यादी न्यायालयात येवुन, त्याने पोलीसांना दिलेली फिर्याद यापासुन मुकरला आहे. तसेच फिर्यादीच्या साक्षीतून अभिलेखावर कुठलीही बाब आलेली नाही. त्यामुळे प्रस्तुतचे प्रकरण पुढे लांबविण्याची आवश्यकता नाही.

**११.** फिर्यादी हाच मुळात फितुर झालेला असल्याने व फिर्यादीला पुरक अशी साक्ष सा.क्र.२ राजेंद्र व सा. क्र.३ विजय यांच्या पुराव्यात आलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने इतर कुठल्याही स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली नाही. तसेच प्रकरणातील फिर्यादी व साक्षीदार क्र.२ व ३ हे फितुर झालेले असल्याने, घटना खरोखरच घडली होती किंवा कसे याबाबत सांक्षकता निर्माण होते. तसेच आरोपी पक्षाने घटनास्थळ पंचनामा नि.क्र.४९ व वैद्यकीय प्रमाणपत्रं नि.क्र.५० व ५१ मान्य केलेले आहेत. घटनास्थळ पंचनाम्यावरुन घटनास्थळ जरी सिध्द झाले, तरी गुन्हा सिध्द झाला असे म्हणता येत नाही. तसेच वैद्यकीय प्रमाणपत्रावरुन जखमां जरी सिध्द झाल्या, तरी सदरच्या जखमा हया आरोपींनींच केल्या, ही बाब सिध्द झाली नाही. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे सादर करण्यात

आलेल्या पुराव्याचे बारकाईने निरीक्षण करता, प्राप्त पुराव्यानुसार आरोपींनी गुन्हा केल्याचे शाबीत होत नाही. तसेच फिर्यादी व आरोपींमध्ये आपसांत तडजोड झाल्यामुळे, आरोपींनी फिर्यादी व त्याच्या भावाला डोक्यात दगडाने मारहाण केली व लाथाबुक्यांनी मारहाण करुन, जिवे मारण्याची धमकी दिली, हया बाबी शाबीत होवु शकलेल्या नाहीत. त्यामुळे मी मुद्दे क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवितो.

**मुद्दा क्र.–४ करिता –**

**१२.** वरील नमुद मुद्दे क्र.–१ ते ३ चे विवेचन, अभियोग पक्षाचा पुरावा व तसेच फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये झालेली तडजोड या सर्व बाबींचा विचार करता, आरोपीं हे उपरोक्त नमूद दोषारोपातुन मुक्त होण्यास पात्र ठरतात. सबब, मी मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

**०१.** आरोपी क्र.१. मिलींद भावराव धिवर, २. वैशाली बाळकृष्ण जाधव, ३. जिजाबाई भावराव धिवर यांची भारतीय दंड विधानाचे कलम ३२४, ३२३ व ५०६ सहकलम ३४ अन्वये दाखल असलेल्या दोषारोपातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

**०२.** एक काळसर रंगाचा ओबड–धोबड दगड अंदाजे ७५० ग्रॅम वजनाचा हा मुल्यहिन असल्याने, अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

**०३.** आरोपींचे जातमुचलके व जामीनबंधपत्र रद्द करण्यात येतात.

**०४.** फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ नुसार आरोपींनी प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तीक बंधपत्र व जात मुचलका द्यावे.

Digitally signed by PATIL MAHENDRA BHAGWAN
Date: 2026.08.11 17:20:31 +0530

**दिनांक –११.०८.२०२६** [एम.बी. पाटील]

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

सोयगांव

# CERTIFICATE

"I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word to word, as per original Judgment".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Y. S. Mali |
| Court | : | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | : | 11.08.2026 |
| Judgment signed by presiding Officer on | : | 11.08.2026 |
| Judgment uploaded on | : | 11.08.2026 |